क्रमांक : का.स./बैठक/२१८

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण,
वांद्रे-कुर्ला समूह, वांद्रे (पूर्व),
मुंबई - ४०० ०५१.

दिनांक : २२ डिसेंबर, २००६.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक २१ नोव्हेंबर, २००६ (मंगळवार) रोजी झालेल्या २१८ व्या बैठकीच्या कार्यवृत्ताची प्रत सोबत पाठवित आहे.

22.12.2006

सचिव,
कार्यकारी समिती

प्रति :

मुख्य सचिव,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२. - अध्यक्ष

श्री.द.म.सुकथनकर,
"प्रिया", वरळी सी फेस, वरळी,
मुंबई - ४०० ०१८. - सदस्य

श्री.र.य.तांबे,
ए-६००, शिवम अपार्टमेंट्स,
सुरेंद्रनगर, आरपीटीएस रोड,
नागपूर - ४४० ०१५. - सदस्य

श्री. हरिशंकरन्,
कार्यकारी संचालक - इन्फ्रास्ट्रक्चर,
इन्फ्रास्ट्रक्चर लिजिंग अँड फिनान्सिअल सर्व्हिसेस लिमिटेड,
वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व),
मुंबई - ४०० ०५१. - सदस्य

अति. मुख्य सचिव,
नगर विकास विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२. - सदस्य

महापालिका आयुक्त, - सदस्य
बृहन्मुंबई महानगरपालिका,
मुंबई - ४०० ००१.

सचिव, - सदस्य
गृहनिर्माण विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

व्यवस्थापकीय संचालक - सदस्य
सिडको,
निर्मल, नरीमन पॉईंट,
मुंबई - ४०० ०२३.

महानगर आयुक्त - सदस्य
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण.

निमंत्रित :

प्रधान सचिव (२),
नगर विकास विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

प्रधान सचिव,
पर्यावरण विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

सचिव (उद्योग),
उद्योग, उर्जा व कामगार विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

# मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या २१८ व्या बैठकीचे कार्यवृत्त

| | | |
|---|---|---|
| दिनांक | : | २१ नोव्हेंबर, २००६ (मंगळवार) |
| वेळ | : | सकाळी ११.३० वाजता |
| सभास्थान | : | मा.मुख्य सचिव यांचे समिती कक्ष,<br>५ वा मजला, मंत्रालय,<br>मुंबई - ४०० ०३२. |

**उपस्थित सदस्य :**

| | | |
|---|---|---|
| डॉ.डी.के.शंकरन<br>मुख्य सचिव,<br>महाराष्ट्र शासन | - | अध्यक्ष |
| श्री.र.य.तांबे | - | सदस्य |
| श्री.रामानंद तिवारी<br>प्रधान सचिव (१),<br>नगर विकास विभाग,<br>महाराष्ट्र शासन | - | सदस्य |
| श्री.जॉनी जोसेफ<br>महापालिका आयुक्त,<br>बृहन्मुंबई महानगरपालिका | - | सदस्य |
| श्री.स्वाधीन क्षत्रीय<br>सचिव,<br>गृहनिर्माण विभाग,<br>महाराष्ट्र शासन | - | सदस्य |
| डॉ.टी.चंद्र शेखर<br>महानगर आयुक्त | - | सदस्य |

**निमंत्रित :**

श्री.मिलिंद म्हैसकर<br>सह-महानगर आयुक्त / प्रकल्प संचालक,<br>मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

..२/-

श्री.दीपक कपूर
सह व्यवस्थापकीय संचालक,
सिडको
(व्यवस्थापकीय संचालक, सिडको यांचे प्रतिनिधी म्हणून)

श्री.के.एन.पटेल
विधी सल्लागार
मुं.म.प्र.वि. प्राधिकरण

श्री.सुरेश परदेशी
मुख्य लेखा अधिकारी व वित्त सल्लागार,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री.अ.वि.देशिंगकर
विशेष कार्य अधिकारी (अभियांत्रिकी),
मुं.म.प्र.वि. प्राधिकरण

श्री.पी.आर.के.मुर्ती
प्रमुख, परिवहन व दळणवळण विभाग,
मुं.म.प्र.वि. प्राधिकरण

श्री.यु.व्ही.लुकतुके
प्रमुख, नगर व क्षेत्र नियोजन विभाग,
मुं.म.प्र.वि. प्राधिकरण

कु.उमा अडसुमिली
प्रमुख, नियोजन विभाग,
मुं.म.प्र.वि. प्राधिकरण

श्री.डी.डी.भिडे
मुख्य अभियंता,
मिठी नदी विकास व संरक्षण प्राधिकरण

श्री.श्री.र.नंदर्गीकर
मुख्य अभियंता,
अभियांत्रिकी विभाग
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री.सु.मो.रामचंदानी
मुख्य अभियंता,
अभियांत्रिकी विभाग
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री.प्र.ह.राऊत
सचिव, कार्यकारी समिती,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

**बाब क्र.१ : प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक २५ जुलै, २००६ रोजी झालेल्या २१७ व्या बैठकीचे कार्यवृत्त कायम करणे.**

कार्यवृत्त कायम करण्यात आले.

**बाब क्र.२ : प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक २५ जुलै, २००६ रोजी झालेल्या २१७ व्या बैठकीच्या कार्यवृत्तावरील कार्यवाही अहवाल.**

२.१ कार्यवृत्तावरील कार्यवाही अहवालासंबंधात खालीलप्रमाणे चर्चा झाली :-

**बाब क्र.२ : प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक १७ मे, २००६ रोजी झालेल्या २१६ व्या बैठकीच्या कार्यवृत्तावरील कार्यवाही अहवाल.**

— **आयकर विभागाने सन २००२-०३ या आर्थिक वर्षामध्ये प्राधिकरणाच्या उत्पन्नावर रु.२२५.२७ कोटी इतका आयकर भरण्याकरीता केलेली मागणी - रु.१ कोटी इतकी लाक्षणिक रक्कम भरण्याबाबत.**

महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, कार्यकारी समितीच्या मान्यतेनुसार प्राधिकरणाने रु.१ कोटी इतकी लाक्षणिक रक्कम आयकर विभागाकडे भरली आहे. आयकर विभागाने दिनांक २९ ऑगस्ट, २००६ रोजीच्या पत्रान्वये २५% आयकराची रक्कम एक महिन्याच्या आत भरण्यासाठी कळविले होते. त्यास उच्च न्यायालयाने दिनांक ९ ऑक्टोबर, २००६ रोजी स्थगिती दिली आहे. तसेच प्राधिकरणाच्या अधिनियमात सुधारणा करुनही प्राधिकरणास आयकरातून सूट मिळणार नाही असे महा अधिवक्ता यांनी मत व्यक्त केले आहे. त्यानंतर, मा.मुख्यमंत्री महोदयांनी मा.पंतप्रधान व मा.केन्द्रीय

..४/-

वित्तमंत्री यांना पत्र पाठवून विनंती केली आहे की, प्राधिकरणास आयकरातून सूट द्यावी तसेच आयकर अधिनियमाच्या कलम १२(अ) अन्वये प्राधिकरणास मिळालेले ट्रस्टबाबतचे प्रमाणपत्र रद्द करु नये व प्राधिकरणाकडे आयकराची मागणी करु नये असे आयकर आयुक्त यांना निदेश द्यावेत.

**बाब क्र.१० : मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या वेगवेगळ्या रिकाम्या जमिनींचे व मिळकतींचे संरक्षणासाठी बंदूकधारी सुरक्षा रक्षक ठेकेदारांची तीन वर्षाच्या कालावधीसाठी नेमणूक करणेबाबत.**

श्री.र.य.तांबे, सदस्य, कार्यकारी समिती यांनी अशी सूचना केली की, प्राधिकरणाच्या रिकाम्या जमिनींचे व मिळकतींचे संरक्षण करण्यासाठी सुरक्षा रक्षक ठेकेदारांची नेमणूक करण्यात येते. म्हणून अशाप्रकारे कंत्राट पध्दतीने नेमणूक केलेल्या सुमारे १२०० सुरक्षा रक्षकांच्या कामावर देखरेख करण्यासाठी लष्करातून निवृत्त झालेल्या योग्य अधिका-याची पर्यवेक्षक म्हणून प्राधिकरणाने नेमणूक करावी.

अध्यक्ष, कार्यकारी समिती यांनी सदर सूचनेस मान्यता दिली.

**बाब क्र.१३ : मुंबई मेट्रो रेल्वे प्रकल्प - मुंबई मेट्रो रेल्वे महामंडळाचे (MMRC) कायद्याने संस्थापन करण्यासाठी (Incorporation) मे.राईट्स लि. या संस्थेची सल्लागार म्हणून नेमणूक करण्यास कार्योत्तर मंजूरी देणेबाबत.**

श्री.र.य.तांबे, सदस्य, कार्यकारी समिती यांनी विचारणा केली असता महानगर आयुक्त यांनी स्पष्ट केले की, मुंबई मेट्रो रेल्वे प्रकल्पाच्या बृहत योजनेस (Master Plan) मध्य व पश्चिम रेल्वेने यापूर्वीच तत्वतः मान्यता दिली असल्यामुळे मध्य व पश्चिम रेल्वेचे विद्यमान छन्नमार्ग ओलांडून मुंबई मेट्रो रेल्वे प्रकल्पाचे छन्नमार्ग नेण्यास कोणतीही अडचण उद्भवणार नाही.

२.२ त्यानंतर, कार्यवाही अहवालाची नोंद कार्यकारी समितीने घेतली.

**बाब क्र.३ : लाल बहादूर शास्त्री मार्ग व वांद्रे-कुर्ला संकुल यांना जोडणा-या रस्त्याचे रुंदीकरण व मजबूतीकरण तसेच मिठी नदीवरील पुलाच्या उर्वरीत भागाच्या बांधकामासाठीच्या निविदेस मंजूरी मिळणेबाबत.**

३.१ या प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, वांद्रे-कुर्ला जोडरस्त्याची रुंदी ४५ मीटर आहे. तथापि, या रस्त्याच्या लाल बहादूर शास्त्री मार्गापासूनच्या सुमारे २०० मीटर लांबीतील रुंदी २२ मीटर असून या भागातील मिठी नदीवरील ९० मीटर लांबीच्या पूलाची रुंदीसुध्दा २२.५ मीटर आहे. वांद्रे-कुर्ला संकुलासाठी एकूण तीन प्रमुख पोहच मार्ग असून त्यापैकी कलानगर व सी.एस.टी. रस्ता यांचेकडून येणा-या पोहच मार्गाची सुधारणा, रुंदीकरण इत्यादी कामे या आधीच पूर्ण करण्यात आली आहेत. आता सादर केलेल्या प्रस्तावाप्रमाणे लाल बहादूर शास्त्री मार्गाकडील २०० मीटर लांबीतील पोहच मार्ग ४५ मीटर रुंद तसेच मजबूत करावयाचा आहे. तसेच मिठी नदीवर २२.५ मीटर रुंदीचा नवीन पूल बांधून सध्याच्या पूलाशी त्याचे एकात्मिकरण करावयाचे आहे. महानगर आयुक्त यांनी पुढे असेही सांगितले की, सदरील कामाची निविदा सूचना दोन वेळेस सार्वजनिकरित्या प्रसिध्द केली होती. तथापि, दोन्ही वेळेस प्राप्त झालेले देकार अवाजवी असल्याने रद्द करण्यात आले. आता प्राप्त झालेला देकार तृतीय सूचनेस अनुसरुन आहे. सदरील बांधकामासाठी रु.६,९६,१०,०००/- किंमतीची सविस्तर नकाशे व अंदाजपत्रके तत्कालीन दरसूचीनुसार बनविण्यात आली होती. आताच्या तृतीय निविदा सूचनेस अनुसरुन एकूण ३ निविदा संच विकले गेले. त्यापैकी विहित कालावधीमध्ये २ पूर्ण केलेल्या निविदा प्राप्त झाल्या. या निविदांची छाननी करुन सल्लागारांनी दोन्ही निविदाकारांना पात्र घोषित केले. त्यापैकी मे.जे.कुमार ॲन्ड कंपनी (इं) प्रा.लि. यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा १२.४२% जास्त दराची निविदा लघुत्तम असून वाटाघाटीनंतर सदर लघुत्तम निविदाकारांनी त्यांचा देकार ०.१२% कमी केल्यामुळे त्यांचा सुधारित देकार अंदाजित खर्चापेक्षा १२.३०% जास्त दराचा म्हणजे रु.७,८१,७२,०३०/- इतका आहे. तथापि, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या सन २००५-०६ च्या दरसूचीप्रमाणे हा देकार केवळ १.३%

जास्त दराचा आहे. तसेच प्रथम व द्वितीय निविदा सूचनांचे प्रतिसादार्थ प्राप्त झालेल्या लघुत्तम निविदाकारांच्या तुलनेत हा देकार कमी दराचा आहे. मे.जे.कुमार ॲन्ड कंपनी (इं) प्रा.लि. यांचा लघुत्तम देकार निविदेतील सर्व अटींचे अनुपालन करणारा, सुसंवादी व रास्त आहे. म्हणून सदर लघुत्तम देकार कार्यकारी समितीच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आला आहे.

३.२ त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :–

**ठराव क्र.१०१० :**

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोट-कलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, कार्यकारी समिती याद्वारे लाल बहादूर शास्त्री मार्ग व वांद्रे-कुर्ला संकुल यांना जोडणा-या रस्त्याचे रुंदीकरण व मजबूतीकरण तसेच मिठी नदीवरील पूलाच्या उर्वरित भागाचे बांधकाम या कामांसाठी मे.जे.कुमार अँड कंपनी (इंडिया) प्रा.लि. यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा १२.३०% जास्त दराची म्हणजे रु.७,८१,७२,०३०/- (रुपये सात कोटी एक्याऐंशी लाख बहात्तर हजार तीस मात्र) किंमतीची लघुत्तम निविदा स्विकारण्यास व त्या अनुषंगाने करण्यात येणा-या करारनाम्यातील अटींप्रमाणे देय होणा-या संभाव्य आर्थिक बदलासह अधिदान करण्यास मान्यता देत आहे.

"**असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

..७/-

**बाब क्र.४ : मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्प (MUIP) : पश्चिम द्रुतगती महामार्गावरील कुलूपवाडी भुयारी मार्ग ते एस.एम.दुबे जंक्शन (साखळी क्र.५०६/५०० ते ५०४/००० कि.मी.) - पॅकेज क्र.९ मधील रस्त्याचे डांबरीकरण व रुंदीकरण, सेवारस्त्यांचे बांधकाम, गटाराची बांधकामे, कुलूपवाडी भुयारी पदमार्ग आणि शिववल्लभ जंक्शन येथील भुयारी पदमार्गाचे बांधकाम इत्यादि**

**– लघुत्तम निविदेस मंजूरी मिळणेबाबत.**

४.१ या प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत पश्चिम द्रुतगती महामार्गावरील कुलूपवाडी भूयारी मार्ग ते एस.एम.दुबे जंक्शन दरम्यानच्या महामार्गाच्या डांबरीकरणाची कामे करणे या पॅकेज क्र.९ च्या कामासाठी कार्यकारी समितीच्या मान्यतेने मे.अटलांटा इन्फ्रास्ट्रक्चर लि. यांची अंदाजपत्रकीय दराची निविदा मंजूर करुन मार्च, २००४ मध्ये नियुक्ती करण्यात आली होती. त्यानंतर प्रत्यक्ष काम करतेवेळी गरजेनुसार कामाच्या व्याप्तीमध्ये वाढ झाली. तथापि, भूसंपादनास झालेला विलंब, अतिक्रमणे हटविण्यास झालेला विलंब तसेच महामार्गाच्या मुख्य रस्त्याच्या भागातील सेवावाहिन्या स्थलांतरीत करण्यास झालेला विलंब यामुळे काम पूर्ण करण्याचा कालावधी १५ महिन्यांचा असूनही कार्यारंभ आदेशानंतर सुमारे ३० महिन्यांच्या कालावधीनंतर एकूण सुमारे ४२% काम पूर्ण झाले आहे. यापूर्वी २१५ व्या बैठकीत कार्यकारी समितीने मान्यता दिल्याप्रमाणे मे. अटलांटा इन्फ्रास्ट्रक्चर लि. यांच्या निविदेतील रु.३.५० कोटी रक्कमेचे काम अन्य कंत्राटदारास द्यावयाचे होते. तथापि, मे.अटलांटा इन्फ्रास्ट्रक्चर लि. यांच्या विनंतीनुसार हे काम त्यांच्याकडून पूर्ण करण्यात आले आहे. तथापि, दरम्यानच्या कालावधीतील अवाजवी भाववाढ इत्यादी कारणांमुळे कंत्राट करारातील तरतूदीनुसार सदर करार रदद् करण्याची मे.अटलांटा इन्फ्रास्ट्रक्चर लि. यांनी विनंती केली. म्हणून संभाव्य विलंब व परिणामी यंत्रसामुग्री आदींचा अपुरा वापर यामुळे कंत्राटदाराचे नुकसानभरपाईचे दावे टाळण्यासाठी कंत्राट करारातील तरतूदीनुसार सदर करार रदद् करण्यात आला व उर्वरित कामे नवीन कंत्राटाद्वारे हाती घेण्याचे ठरविण्यात आले. या कामांमध्ये उर्वरित मुख्य रस्त्याचे रुंदीकरण व डांबरीकरण, ३ कि.मी. लांबीचे सेवारस्ते, कुलूपवाडी भूयारी पदमार्ग, शिववल्लभ जंक्शन येथील भूयारी पदमार्ग, गटारांची

बांधकामे, कुलूपवाडी टेकडीसाठी संरक्षक उपाययोजना करणे इत्यादी कामे समाविष्ट आहेत. या कामासाठी नव्याने निविदा मागविण्यासाठी रु.१७.६३ कोटी रक्कमेचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले. या कामामुळे बाधित होणाऱ्या प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाची कार्यवाही प्रगतीपथावर आहे. या कामासाठी सार्वजनिकरित्या वृत्तपत्रात जाहिरात देऊन निविदा मागविण्यात आल्या. एकूण ४ कोरे निविदा संच विकले गेले. तथापि, विहित कालावधीमध्ये २ पूर्ण केलेल्या निविदा प्राप्त झाल्या. प्राप्त निविदांपैकी मे.जे.कुमार अँड कंपनी (इंडिया) प्रा. लि. यांची अंदाजपत्रकीय दराची म्हणजे रु.१७,६३,३७,२५३/- किंमतीची निविदा लघुत्तम आहे. सदर लघुत्तम देकार निविदेतील सर्व अटींचे अनुपालन करणारा, सुसंवादी व रास्त आहे. म्हणून सदर लघुत्तम देकार कार्यकारी समितीच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आला आहे.

**४.२** चर्चेदरम्यान सदस्यांनी विचारणा केली असता, महानगर आयुक्त यांनी असे स्पष्ट केले की, भूसंपादन, अतिक्रमणे हटविणे तसेच सेवावाहिन्यांचे स्थलांतर यासाठी झालेल्या विलंबामुळे मे.अटलांटा इन्फ्रास्ट्रक्चर लि. यांना रस्त्याच्या कामासाठी आवश्यक असलेली जागा हस्तांतरीत करण्यास विलंब झाला. त्याचप्रमाणे मूळ निविदेप्रमाणे काम पूर्ण करण्याचा कालावधी १५ महिन्यांचा असूनही कार्यारंभ आदेशानंतर ३० महिन्यांच्या कालावधीत काम पूर्ण होऊ शकले नाही. त्यामुळे करारातील तरतूदीनुसार मे.अटलांटा इन्फ्रास्ट्रक्चर लि. यांचेबरोबरचा करार रद्द (Foreclose) करण्यात आला. या कंत्राटदारास कोणतीही नुकसानभरपाई देण्यात येणार नाही. महानगर आयुक्त यांनी पुढे असेही स्पष्ट केले की, मे.अटलांटा इन्फ्रास्ट्रक्चर लि. यांना यापुढे प्राधिकरणाचे कोणतेही नवीन काम देण्यात येणार नाही.

**४.३** त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-

**<u>ठराव क्र.१०११</u> :**

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोट-कलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या

अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, कार्यकारी समिती याद्वारे मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत पश्चिम द्रुतगती महामार्गावरील कुलूपवाडी भूयारी मार्ग ते एस.एम.दुबे जंक्शन (साखळी क्र.५०६/५०० ते ५०४/०००कि.मी.) मधील उर्वरित मुख्य रस्त्याचे रुंदीकरण व डांबरीकरण करणे, ३ कि.मी. लांबीचे सेवारस्ते, कुलूपवाडी भूयारी पदमार्ग, शिववल्लभ जंक्शन येथील भूयारी पदमार्ग, गटाराचे बांधकाम, कुलूपवाडी टेकडीसाठी संरक्षक उपाययोजना करणे इत्यादी कामांसाठी मे.जे.कुमार अँड कंपनी (इंडिया) प्रा. लि. यांची अंदाजपत्रकीय दराची म्हणजे रु.१७,६३,३७,२५३/- (रुपये सतरा कोटी त्रेसष्ट लाख सदतीस हजार दोनशे त्रेपन्न मात्र) किंमतीची लघुत्तम निविदा स्विकारण्यास व त्या अनुषंगाने करण्यात येणा-या करारनाम्यातील अटींप्रमाणे देय होणा-या संभाव्य आर्थिक बदलासह अधिदान करण्यास मान्यता देत आहे. यापूर्वी सदर कामासाठी नियुक्त केलेले कंत्राटदार मे.अटलांटा इन्फ्रास्ट्रक्चर लि. यांना यापुढे प्राधिकरणाचे कोणतेही नवीन काम देऊ नये.

"**असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.५ : मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्प (MUIP) : पश्चिम द्रुतगती महामार्गावरील आशा नगर भुयारी मार्ग ते कुलूपवाडी भुयारी मार्ग (साखळी क्र.५०८/३०० ते ५०६/५०० कि.मी.) - पॅकेज क्र.८ मध्ये रस्त्याचे डांबरीकरण व रुंदीकरण, भोर जंक्शन येथील भुयारी वाहन मार्गाचे बांधकाम, सेवारस्ते व गटाराचे बांधकाम करणे इत्यादि**

**— लघुत्तम निविदेस मंजूरी मिळणेबाबत.**

**५.१** या प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत पश्चिम द्रुतगती महामार्गावरील आशा नगर भूयारी मार्ग ते कुलूपवाडी भूयारी मार्ग दरम्यानच्या महामार्गाची सुधारणा करणे या पॅकेज क्र.८ च्या कामासाठी कार्यकारी समितीच्या मान्यतेने मे.अटलांटा इन्फ्रास्ट्रक्चर लि. यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा

१.७१% कमी दराची निविदा मंजूर करुन जून, २००४ मध्ये नियुक्ती करण्यात आली होती. तथापि, अतिक्रमणे हटविणे तसेच नाल्यांच्या रुंदीमधील सेवावाहिन्या स्थलांतरीत करणे इत्यादी कामांसाठी विलंब झाल्यामुळे काम पूर्ण करण्याचा कालावधी १५ महिन्यांचा असूनही कार्यारंभ आदेशानंतर सुमारे ३० महिन्यांच्या कालावधीनंतर सुमारे ३५% काम पूर्ण झाले आहे. दरम्यानच्या कालावधीतील अवाजवी भाववाढ इत्यादी कारणांमुळे कंत्राट करारातील तरतूदीनुसार सदर करार रद्द करण्याची मे.अटलांटा इन्फ्रास्ट्रक्चर लि. यांनी विनंती केली. म्हणून संभाव्य विलंब व परिणामी यंत्रसामुग्री आदींचा अपूरा वापर यामुळे कंत्राटदाराचे नुकसानभरपाईचे दावे टाळण्यासाठी कंत्राट करारातील तरतूदीनुसार सदर करार रद्द करण्यात आला. सदर करारातील एकूण रु.१.६४ कोटी रक्कमेची कामे सोडून पश्चिम द्रुतगती महामार्गाच्या साखळी क्र.५०६/५०० ते ५०८/३०० कि.मी. या दरम्यानच्या मुख्य रस्त्याचे रुंदीकरण व डांबरीकरण करणे, लहान पूलांचे बांधकाम, भोर जंक्शन येथे भूयारी वाहनमार्ग बांधणे, आशा नगर व देवीपाडा येथील भूयारी मार्गाचे उर्वरित बांधकाम, २ कि.मी. लांबीचे गटाराचे व सेवारस्त्याचे बांधकाम इत्यादी उर्वरित कामासाठी रु.१८.०९ कोटी रक्कमेचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले. या कामामुळे बाधित होणाऱ्या प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाची कार्यवाही प्रगतीपथावर आहे. या कामासाठी सार्वजनिकरित्या वृत्तपत्रात जाहिरात देऊन निविदा मागविण्यात आल्या. एकूण २ कोरे निविदा संच विकले गेले व विहित कालावधीमध्ये २ पूर्ण केलेल्या निविदा प्राप्त झाल्या. प्राप्त निविदांपैकी मे.जे.कुमार अँड कंपनी (इंडिया) प्रा. लि. यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा ८.९०% जास्त दराची निविदा लघुत्तम असून वाटाघाटीनंतर त्यांनी सादर केलेला सुधारित देकार अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५% जास्त दराचा म्हणजे रु.१८,९९,५१,९५५/- इतका आहे. सदर सुधारित लघुत्तम देकार हा निविदेतील सर्व अटींचे अनुपालन करणारा, सुसंवादी व रास्त असल्यामुळे कार्यकारी समितीच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आला आहे.

५.२ चर्चेदरम्यान सदस्यांनी विचारणा केली असता, महानगर आयुक्त यांनी असे स्पष्ट केले की, करारातील तरतूदीनुसार मे.अटलांटा इन्फ्रास्ट्रक्चर लि. यांचा करार रद्द (Foreclose)

करण्यात आला असून या कंत्राटदारास कोणतीही नुकसानभरपाई देण्यात येणार नाही. तसेच मे.अटलांटा इन्फ्रास्ट्रक्चर लि. यांना यापुढे प्राधिकरणाचे कोणतेही नवीन काम देण्यात येणार नाही.

५.३ त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :—

<u>ठराव क्र.१०१२</u> :

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोट-कलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, कार्यकारी समिती याद्वारे मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत पश्चिम द्रुतगती महामार्गावरील आशा नगर भूयारी मार्ग ते कुलूपवाडी भूयारी मार्ग (साखळी क्र.५०६/५०० ते ५०८/३००कि.मी.) मधील मुख्य रस्त्याचे रुंदीकरण व डांबरीकरण करणे, लहान पूलांचे बांधकाम, भोर जंक्शन येथे भूयारी वाहनमार्ग बांधणे, आशा नगर व देवीपाडा येथील भूयारी मार्गाचे उर्वरित बांधकाम, २ कि.मी. लांबीचे गटाराचे व सेवारस्त्याचे बांधकाम इत्यादी कामांसाठी मे.जे.कुमार अँड कंपनी (इंडिया) प्रा. लि. यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५% जास्त दराची म्हणजे रु.१८,९९,५१,९५५/- (रुपये अठरा कोटी नव्याण्णव लाख एक्कावन्न हजार नऊशे पंचावन्न मात्र) किंमतीची सुधारित लघुत्तम निविदा स्विकारण्यास व त्या अनुषंगाने करण्यात येणा-या करारनाम्यातील अटींप्रमाणे देय होणा-या संभाव्य आर्थिक बदलासह अधिदान करण्यास मान्यता देत आहे. यापूर्वी सदर कामासाठी नियुक्त केलेले कंत्राटदार मे.अटलांटा इन्फ्रास्ट्रक्चर लि. यांना यापुढे प्राधिकरणाचे कोणतेही नवीन काम देऊ नये.

"**असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

..१२/-

**बाब क्र.६ : मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्प (MUIP) : पश्चिम द्रुतगती महामार्गावरील टाईम्स ऑफ इंडिया जंक्शन ते आशा नगर भुयारी मार्ग (साखळी क्र.५१०/४५० ते ५०८/३०० कि.मी.) - पॅकेज क्र.७ मध्ये रस्त्याचे डांबरीकरण व रुंदीकरण, लहान मो-या व पुलांचे रुंदीकरण करणे, आकुर्ली येथील भुयारी वाहन मार्गाचे रुंदीकरण, सेवारस्ते व गटाराचे बांधकाम करणे इत्यादि**

**— लघुत्तम निविदेस मंजूरी मिळणेबाबत**

६.१ या प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत पश्चिम द्रुतगती महामार्गावरील टाईम्स ऑफ इंडिया जंक्शन ते आशा नगर भूयारी मार्ग दरम्यानच्या महामार्गाच्या डांबरीकरणाचे काम करणे या पॅकेज क्र.७ च्या कामासाठी कार्यकारी समितीच्या मान्यतेने मे.अटलांटा इन्फ्रास्ट्रक्चर लि. यांची अंदाजपत्रकीय दराची निविदा मंजूर करुन मार्च, २००४ मध्ये नियुक्ती करण्यात आली होती. त्यानंतर प्रत्यक्ष काम करतेवेळी गरजेनुसार कामाच्या व्याप्तीमध्ये वाढ झाली. तथापि, अतिक्रमणे हटविणे, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या पाणीपुरवठा करणा-या जलवाहिन्या स्थलांतरीत करणे तसेच नाल्यांच्या रुंदीमधील सेवावाहिन्या स्थलांतरीत करणे इत्यादी कामांसाठी झालेल्या विलंबामुळे काम पूर्ण करण्याचा कालावधी १५ महिन्यांचा असूनही कार्यारंभ आदेशानंतर सुमारे ३० महिन्यांच्या कालावधीनंतर एकूण सुमारे ६९% काम पूर्ण झाले आहे. यापूर्वी २१५ व्या बैठकीत कार्यकारी समितीने मान्यता दिल्याप्रमाणे मे.अटलांटा इन्फ्रास्ट्रक्चर लि. यांच्या निविदेतील रु.५ कोटी रक्कमेची कामे मे.जे.कुमार अँड कंपनी (इंडिया) प्रा. लि. यांना मूळ कंत्राटातील अटी व शर्तीप्रमाणे देण्यात येऊन पूर्ण करण्यात आली. दरम्यानच्या कालावधीतील अवाजवी भाववाढ इत्यादी कारणांमुळे कंत्राट करारातील तरतूदीनुसार सदर करार रद्द करण्याची मे.अटलांटा इन्फ्रास्ट्रक्चर लि.यांनी विनंती केली. म्हणून संभाव्य विलंब व परिणामी यंत्रसामुग्री आदींचा अपूरा वापर यामुळे कंत्राटदाराचे नुकसानभरपाईचे दावे टाळण्यासाठी कंत्राट करारातील तरतूदीनुसार तसेच कंत्राटदाराच्या अर्जाप्रमाणे सदर करार रदद् करण्यात आला व उर्वरित कामे नवीन कंत्राटाद्वारे हाती घेण्याचे ठरविण्यात आले. या कामामध्ये उर्वरित लांबीच्या रस्त्याचे

डांबरीकरण व रुंदीकरण, लहान मो-या व पूलांचे रुंदीकरण, आकुर्ली येथील भूयारी वाहन मार्गाचे रुंदीकरण, सेवारस्ते व गटाराचे बांधकाम इत्यादी कामे समाविष्ट आहेत. या कामासाठी नव्याने निविदा मागविण्यासाठी रु.१३.२४ कोटी रक्कमेचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले. या कामामुळे बाधित होणा-या प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाची कार्यवाही प्रगतीपथावर आहे. या कामासाठी सार्वजनिकरित्या वृत्तपत्रात जाहिरात देऊन निविदा मागविण्यात आल्या. एकूण ४ कोरे निविदा संच विकले गेले. तथापि, विहित कालावधीमध्ये मे.जे.कुमार अँड कंपनी (इंडिया) प्रा. लि. यांची एकच निविदा प्राप्त झाली. सदर निविदा अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.५% जास्त दराची असून वाटाघाटीनंतर मे.जे.कुमार अँड कंपनी (इंडिया) प्रा. लि. यांनी दिलेला सुधारित देकार अंदाजपत्रकीय दराचा म्हणजे रु.१३,२४,०३,७७९/- किंमतीचा आहे. सदर देकार निविदेतील सर्व अटींचे अनुपालन करणारा, सुसंवादी व रास्त असल्यामुळे कार्यकारी समितीच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आला आहे. महानगर आयुक्त यांनी पुढे असेही सांगितले की, करारातील तरतुदीनुसार मे.अटलांटा इन्फ्रास्ट्रक्चर लि. यांचा करार रद्द (Foreclose) करण्यात आला असून या कंत्राटदारास कोणतीही नुकसानभरपाई देण्यात येणार नाही. तसेच मे.अटलांटा इन्फ्रास्ट्रक्चर लि. यांना यापुढे प्राधिकरणाचे कोणतेही नवीन काम देण्यात येणार नाही.

६.२ त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :–

<u>ठराव क्र.१०१३</u> :

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोट-कलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, कार्यकारी समिती याद्वारे मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत पश्चिम द्रुतगती महामार्गावरील टाईम्स ऑफ इंडिया जंक्शन ते आशा नगर भूयारी मार्ग (साखळी क्र.५१०/४५० ते ५०८/३००कि.मी.) मधील उर्वरित लांबीतील रस्त्याचे डांबरीकरण व रुंदीकरण करणे, लहान

मो-या व पूलांचे रुंदीकरण, आकुर्ली येथील भूयारी वाहनमार्गाचे रुंदीकरण, अंदाजे २ कि.मी. लांबीतील सेवारस्ते व गटाराचे बांधकाम इत्यादी कामांसाठी मे.जे.कुमार अँड कंपनी (इंडिया) प्रा.लि. यांची अंदाजपत्रकीय दराची म्हणजे रु.१३,२४,०३,७७९/- (रुपये तेरा कोटी चौवीस लाख तीन हजार सातशे एकोणऐंशी मात्र) किंमतीची निविदा स्विकारण्यास व त्या अनुषंगाने करण्यात येणा-या करारनाम्यातील अटींप्रमाणे देय होणा-या संभाव्य आर्थिक बदलासह अधिदान करण्यास मान्यता देत आहे. यापूर्वी सदर कामासाठी नियुक्त केलेले कंत्राटदार मे.अटलांटा इन्फ्रास्ट्रक्चर लि. यांना यापुढे प्राधिकरणाचे कोणतेही नवीन काम देऊ नये.

"**असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.७ : मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत पश्चिम द्रुतगती महामार्गावरील पॅकेज १ ते ४ मधील बांद्रा ते दहिसर या भागातील मास्टीक अस्फाल्टच्या कामासाठी लघुत्तम निविदेला मान्यता मिळणेबाबत.**

७.१ या प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत मुंबई उपनगरातील रस्त्यांची कामे प्राधिकरणाने हाती घेतली आहेत. जुलै, २००५ मध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे रस्त्याचे डांबरी पृष्ठभाग कमकूवत झाले, खडीमिश्रीत डांबरी थर सुटू लागले व रस्त्यावर खड्डे पडले. सदर कामे ऑक्टोबर, २००४ ते एप्रिल, २००५ या कालावधीत करण्यात आली असून निविदा शर्तीनुसार रस्त्यांच्या दुरुस्तीची कामे संबंधीत ठेकेदाराने स्वखर्चाने करावयाची आहेत व त्यासाठी परफॉर्मन्स सिक्युरिटी घेण्यात आली आहे. ज्या ठिकाणी रस्त्यावर मास्टीक अस्फाल्टचा पृष्ठभाग करण्यात आला त्या रस्त्यांची कामे सुस्थितीत असल्याचे दिसून आले. सदर कामे काँक्रीटने केल्यास रस्ता २० वर्षांपर्यंत टिकाऊ होऊ शकेल. परंतु त्यासाठी किमान २ ते ३ वर्षांचा कालावधी लागेल. या कालावधीत

..१५/-

वाहतूक वळविणे शक्य नसल्यामुळे वाहतूकीची प्रचंड कोंडी निर्माण होईल. तसेच मा.उच्च न्यायालयाने रस्त्यावरील खड्डयांबाबत तीव्र नापसंती व्यक्त केली आहे. या सर्व बाबींचा विचार करुन सदर निविदांमध्ये आवश्यकतेप्रमाणे अस्फाल्टीक कॉँक्रीट ऐवजी मास्टीक अस्फाल्टचा समावेश करण्यात आला जेणेकरुन रस्ता पावसाळयातही दिर्घकाळ सुस्थितीत राहील. पूर्वी मास्टीक अस्फाल्टने केलेले काम वगळून अन्य ठिकाणी आवश्यकतेनुसार काम करण्यात येईल. त्यासाठी प्राधिकरणाचे मुख्य अभियंता रस्त्यावर खड्डे पडलेल्या ठिकाणांचा आढावा घेतील व मास्टीक अस्फाल्टने करावयाची कामे निश्चित करतील. महानगर आयुक्त यांनी पुढे असेही सांगितले की, मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत पश्चिम द्रुतगती महम्मार्गावरील पॅकेज क्र. १ ते ४ मधील वांद्रे ते दहिसर या भागातील सर्व मास्टीक अस्फाल्टच्या कामाचा अंदाजपत्रकीय खर्च रु.११४४.३९ लाख इतका असून सार्वजनिक बांधकाम विभागाच्या विद्यमान दरसूचीनुसार सदर अंदाजित खर्च रु.१३५२.६१ लाख इतका आहे. सदर खर्च मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पासाठी प्रशासकीय मान्यता दिलेल्या निधीतून करावयाचा आहे. सदर ४० मि.मी. जाडीचे मास्टीक अस्फाल्टचे काम मुनष्यबळाच्या मदतीने केल्यास बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सन २००४ च्या फेअर मार्केट रेट (दरसूची) नुसार त्याचा दर रु.५१९/- प्रति चौ.मी. इतका आहे तर सार्वजनिक बांधकाम विभागाच्या विद्यमान दरसूचीनुसार सदर दर रु.६१८/- प्रति चौ.मी. इतका असून त्याचा दोषदायित्व कालावधी ५ वर्षाचा आहे. तथापि, हे काम आधुनिक तंत्रज्ञान उदा. मेकॅनिकल पेव्हर इत्यादी वापरुन केल्यास रु.७४७/- प्रति चौ.मी. इतका दर देण्यात येईल व अशा पध्दतीने केलेल्या कामाचा दोषदायित्व कालावधी १० वर्ष राहील. महानगर आयुक्त यांनी असेही सांगितले की, या कामासाठी सार्वजनिकरित्या वृत्तपत्रात जाहिरात देऊन निविदा मागविण्यात आल्या. एकूण ७ कोरे निविदा संच विकले गेले. तथापि, विहित कालावधीमध्ये प्राप्त झालेल्या ४ निविदांपैकी छाननीनंतर ३ निविदा पात्र ठरल्या. त्यापैकी मे.सी.परकाशन यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३५.३५% जास्त दराची निविदा लघुत्तम असून वाटाघाटीनंतर सदर निविदाकारांनी सादर केलेला सुधारित देकार अंदाजित खर्चापेक्षा ३४.८५% जास्त दराचा आहे. हा देकार अवाजवी असल्यामुळे मे.एस.एम.एस. इन्फ्रास्ट्रक्चर्स लि.

..१६/-

- वेस्ट कोस्ट (जे.व्ही.) या व्दितीय लघुत्तम निविदाकारासमवेत वाटाघाटी केल्यानंतर त्यांनी त्यांचा देकार अंदाजपत्रकीय दरापेक्षा १८% जास्त म्हणजे रु.१३,५०,३७,५०७/- असा सुधारित केला. द्वितीय लघुत्तम निविदाकाराचा हा सुधारित देकार सार्वजनिक बांधकाम विभागाच्या विद्यमान दरसूचीनुसार तयार केलेल्या अंदाजित खर्चापेक्षा ०.१६५% कमी दराचा आहे. तथापि, आधुनिक तंत्रज्ञान वापरुन केलेल्या मास्टीक अस्फाल्टच्या कामासाठी निविदाकाराचा सदर वाढीव दर लागू होणार नाही. तसेच पूर्वी काम केलेल्या कंत्राटदाराच्या दोषदायित्व कालावधीची रक्कम संबंधीत कंत्राटदाराकडून वाजवी दराने वसूल करण्यात येईल. मे.एस.एम.एस.इन्फ्रास्ट्रक्चर्स लि.- वेस्ट कोस्ट (जे.व्ही.) या व्दितीय लघुत्तम निविदाकाराने वाटाघाटीनंतर सादर केलेला सुधारित देकार निविदेतील सर्व अटींचे अनुपालन करणारा, सुसंवादी व रास्त असल्याने कार्यकारी समितीच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आला आहे.

७.२ त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :—

<u>ठराव क्र.१०१४</u> :

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोट-कलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, कार्यकारी समिती याद्वारे मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत पश्चिम द्रुतगती महामार्गावरील पॅकेज क्र.१ ते ४ मधील वांद्रे ते दहिसर या भागातील मास्टीक अस्फाल्टच्या कामासाठी मे.एस.एम.एस. इन्फ्रास्ट्रक्चर्स लिमिटेड - वेस्ट कोस्ट (जॉईंट व्हेंचर) यांची रु.१३,५०,३७,५०७/- (रु.तेरा कोटी पन्नास लाख सदतीस हजार पाचशे सात मात्र) इतक्या किंमतीची लघुत्तम निविदा स्विकारण्यास व त्या अनुषंगाने करण्यात येणा-या करारनाम्यातील अटींप्रमाणे देय होणा-या संभाव्य आर्थिक बदलासह अधिदान करण्यास मान्यता देत आहे. आधुनिक तंत्रज्ञान वापरुन केलेल्या मास्टीक अस्फाल्टच्या

कामासाठी निविदाकाराचा सदर वाढीव दर लागू होणार नाही. तसेच पूर्वी काम केलेल्या कंत्राटदाराच्या दोषदायित्व कालावधीची रक्कम संबंधीत कंत्राटदाराकडून वाजवी दराने वसूल करण्यात येईल.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.८ : मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत पश्चिम द्रुतगती महामार्गावरील पॅकेज क्र.५, ६, १० बांद्रा ते दहिसर दरम्यानच्या भागातील मास्टीक अस्फाल्टचे कामासाठी लघुत्तम निविदेला मान्यता मिळणेबाबत.**

**८.१** या प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत पश्चिम द्रुतगती महामार्गावरील पॅकेज क्र.५,६,१० मधील वांद्रे ते दहिसर या भागातील सर्व मास्टीक अस्फाल्टच्या कामाचा अंदाजपत्रकीय खर्च रु.८७५.७९ लाख असून सार्वजनिक बांधकाम विभागाच्या विद्यमान दरसूचीनुसार सदर अंदाजित खर्च रु.१०३५.१५ लाख इतका आहे. सदर खर्च मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पासाठी प्रशासकीय मान्यता दिलेल्या निधीतून करावयाचा आहे. पूर्वी मास्टीक अस्फाल्टने केलेले काम वगळून अन्य ठिकाणी आवश्यकतेनुसार काम करण्यात येईल. त्यासाठी प्राधिकरणाचे मुख्य अभियंता रस्त्यावर खड्डे पडलेल्या ठिकाणांचा आढावा घेतील व मास्टीक अस्फाल्टने करावयाची कामे निश्चित करतील. सदर ४० मि.मी. जाडीचे मास्टीक अस्फाल्टचे काम मुनष्यबळाच्या मदतीने केल्यास बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सन २००४ च्या फेअर मार्केट रेट (दरसूची) नुसार त्याचा दर रु.५१९/- प्रति चौ.मी. इतका आहे तर सार्वजनिक बांधकाम विभागाच्या विद्यमान दरसूचीनुसार सदर दर रु.६१८/- प्रति चौ.मी. इतका असून त्याचा दोषदायित्व कालावधी ५ वर्षाचा आहे. तथापि, हे काम आधुनिक तंत्रज्ञान उदा. मेकॅनिकल पेव्हर इत्यादी वापरुन केल्यास रु.७४७/- प्रति चौ.मी. इतका दर देण्यात येईल व अशा पध्दतीने केलेल्या कामाचा दोषदायित्व कालावधी १० वर्ष

राहील. या कामासाठी सार्वजनिकरित्या वृत्तपत्रात जाहिरात देऊन निविदा मागविण्यात आल्या. एकूण ८ कोरे निविदा संच विकले गेले. तथापि, विहित कालावधीमध्ये २ पूर्ण केलेल्या निविदा प्राप्त झाल्या. छाननीनंतर या दोन्ही निविदा पात्र ठरल्या. त्यापैकी मे.सी.परकाशन या लघुत्तम निविदाकारांनी वाटाघाटीनंतर सादर केलेला सुधारित देकार अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३४.८५% जास्त दराचा आहे. हा देकार अवाजवी असल्यामुळे, मे.एस.एम.एस.इन्फ्रास्ट्रक्चर्स लि.- वेस्ट कोस्ट (जे.व्ही.) या व्दितीय लघुत्तम निविदाकारासमवेत वाटाघाटी केल्यानंतर त्यांनी त्यांचा देकार अंदाजपत्रकीय दरापेक्षा १८% जास्त म्हणजे रु.१०,३३,४३,८१०/- असा सुधारित केला. हा सुधारित देकार सार्वजनिक बांधकाम विभागाच्या विद्यमान दरसूचीनुसार तयार केलेल्या अंदाजित खर्चापेक्षा ०.१६५% कमी दराचा आहे. तथापि, आधुनिक तंत्रज्ञान वापरुन केलेल्या मास्टीक अस्फाल्टच्या कामासाठी निविदाकाराचा सदर वाढीव दर लागू होणार नाही. तसेच पूर्वी काम केलेल्या कंत्राटदाराच्या दोषदायित्व कालावधीची रक्कम संबंधीत कंत्राटदाराकडून वाजवी दराने वसूल करण्यात येईल. मे.एस.एम.एस.इन्फ्रास्ट्रक्चर्स लि.- वेस्ट कोस्ट (जे.व्ही.) या व्दितीय लघुत्तम निविदाकाराने वाटाघाटीनंतर सादर केलेला सुधारित देकार निविदेतील सर्व अटींचे अनुपालन करणारा, सुसंवादी व रास्त असल्याने कार्यकारी समितीच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आला आहे.

८.२ त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :—

__ठराव क्र.१०१५__ :

**"असा ठराव करण्याल येल आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोट-कलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, कार्यकारी समिती याद्वारे मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत पश्चिम द्रुतगती

..१९/-

महामार्गावरील पॅकेज क्र.५,६,१० मधील वांद्रे ते दहिसर या भागातील मास्टीक अस्फाल्टच्या कामासाठी मे.एस.एम.एस.इन्फ्रास्ट्रक्चर्स लि. - वेस्ट कोस्ट (जॉईंट व्हेंचर) यांची रु.१०,३३,४३,८१०/- (रुपये दहा कोटी तेहतीस लाख त्रेचाळीस हजार आठशे दहा मात्र) किंमतीची लघुत्तम निविदा स्विकारण्यास व त्या अनुषंगाने करण्यात येणा-या करारनाम्यातील अटींप्रमाणे देय होणा-या संभाव्य आर्थिक बदलासह अधिदान करण्यास मान्यता देत आहे. आधुनिक तंत्रज्ञान वापरुन केलेल्या मास्टीक अस्फाल्टच्या कामासाठी निविदाकाराचा सदर वाढीव दर लागू होणार नाही. तसेच पूर्वी काम केलेल्या कंत्राटदाराच्या दोषदायित्व कालावधीची रक्कम संबंधीत कंत्राटदाराकडून वाजवी दराने वसूल करण्यात येईल.

"**असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.९ : मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत पूर्व द्रुतगती महामार्गावरील पॅकेज क्र. ११, १२ मधील सायन ते गोदरेज गेट (उत्तर) या भागातील मास्टीक अस्फाल्टच्या कामासाठी लघुत्तम निविदेला मान्यता मिळणेबाबत.**

९.१ या प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत पूर्व द्रुतगती महामार्गावरील पॅकेज क्र.११,१२ मधील सायन ते गोदरेज गेट (उत्तर) या भागातील सर्व मास्टीक अस्फाल्टच्या कामाचा अंदाजपत्रकीय खर्च रु.१३०३.७६ लाख असून सार्वजनिक बांधकाम विभागाच्या विद्यमान दरसूचीनुसार सदर अंदाजित खर्च रु.१५३९.३८ लाख इतका आहे. सदर खर्च मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पासाठी प्रशासकीय मान्यता दिलेल्या निधीतून करावयाचा आहे. पूर्वी मास्टीक अस्फाल्टने केलेले काम वगळून अन्य ठिकाणी आवश्यकतेनुसार काम करण्यात येईल. त्यासाठी प्राधिकरणाचे मुख्य अभियंता रस्त्यावर खड्डे पडलेल्या ठिकाणांचा आढावा घेतील व मास्टीक अस्फाल्टने करावयाची

..२०/-

कामे निश्चित करतील. सदर ४० मि.मी. जाडीचे मास्टीक अस्फाल्टचे काम मुनष्यबळाच्या मदतीने केल्यास बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सन २००४ च्या फेअर मार्केट रेट (दरसूची) नुसार त्याचा दर रु.५१९/- प्रति चौ.मी. इतका आहे तर सार्वजनिक बांधकाम विभागाच्या विद्यमान दरसूचीनुसार सदर दर रु.६१८/- प्रति चौ.मी. इतका असून त्याचा दोषदायित्व कालावधी ५ वर्षाचा आहे. तथापि, हे काम आधुनिक तंत्रज्ञान उदा. मेकॅनिकल पेव्हर इत्यादी वापरुन केल्यास रु.७४७/- प्रति चौ.मी. इतका दर देण्यात येईल व अशा पध्दतीने केलेल्या कामाचा दोषदायित्व कालावधी १० वर्ष राहील. या कामासाठी सार्वजनिकरित्या वृत्तपत्रात जाहिरात देऊन निविदा मागविण्यात आल्या. एकूण ८ कोरे निविदा संच विकले गेले. तथापि, विहित कालावधीमध्ये प्राप्त झालेल्या ३ निविदांपैकी छाननीनंतर २ निविदा पात्र ठरल्या. त्यापैकी मे.झूम व्ही.एस.ई.पी.एल (जॉईंट व्हेंचर) यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा १८.८१% जास्त दराची निविदा लघुत्तम असून वाटाघाटीनंतर सदर लघुत्तम निविदाकारांनी सादर केलेला सुधारित देकार अंदाजपत्रकीय दरापेक्षा १८% जास्त दराचा म्हणजे रु.१५,३८,४३,७९८/- इतका आहे. हा सुधारित देकार सार्वजनिक बांधकाम विभागाच्या विद्यमान दरसूचीनुसार तयार केलेल्या अंदाजित खर्चापेक्षा ०.०६१% कमी दराचा आहे. तथापि, आधुनिक तंत्रज्ञान, वापरुन केलेल्या मास्टीक अस्फाल्टच्या कामासाठी निविदाकाराचा सदर वाढीव दर लागू होणार नाही. तसेच पूर्वी काम केलेल्या कंत्राटदाराच्या दोषदायित्व कालावधीची रक्कम संबंधीत कंत्राटदाराकडून वाजवी दराने वसूल करण्यात येईल. मे.झूम.व्ही.एस.ई.पी.एल. (जॉईंट व्हेंचर) यांचा सुधारित लघुत्तम देकार निविदेतील सर्व अटींचे अनुपालन करणारा, सुसंवादी व रास्त असल्यामुळे कार्यकारी समितीच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आला आहे.

९.२ त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-

<u>ठराव क्र.१०१६</u> :

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोट-कलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या

अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, कार्यकारी समिती याद्वारे मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत पूर्व द्रुतगती महामार्गावरील पॅकेज क्र.११ व १२ मधील सायन ते गोदरेज गेट (उत्तर) या भागातील मास्टीक अस्फाल्टच्या कामासाठी मे.झूम.व्ही.एस.ई.पी.एल. (जॉईंट व्हेंचर) यांची रु.१५,३८,४३,७९८/- (रुपये पंधरा कोटी अडतीस लाख त्रेचाळीस हजार सातशे अठयाण्णव मात्र) किंमतीची लघुत्तम निविदा स्विकारण्यास व त्या अनुषंगाने करण्यात येणा-या करारनाम्यातील अटींप्रमाणे देय होणा-या संभाव्य आर्थिक बदलासह अधिदान करण्यास मान्यता देत आहे. आधुनिक तंत्रज्ञान वापरुन केलेल्या मास्टीक अस्फाल्टच्या कामासाठी निविदाकाराचा सदर वाढीव दर लागू होणार नाही. तसेच पूर्वी काम केलेल्या कंत्राटदाराच्या दोषदायित्व कालावधीची रक्कम संबंधीत कंत्राटदाराकडून वाजवी दराने वसूल करण्यात येईल.

"**असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.१० : मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत पूर्व द्रुतगती महामार्गावरील पॅकेज क्र. १३, १४, १५ मधील गोदरेज गेट उत्तर ते मुलुंड चेक नाका या भागातील मास्टीक अस्फाल्टच्या कामासाठी लघुत्तम निविदेला मान्यता मिळणेबाबत.**

१०.१ या प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत पूर्व द्रुतगती महामार्गावरील पॅकेज क्र.१३,१४,१५ मधील गोदरेज गेट (उत्तर) ते मुलुंड चेकनाका या भागातील सर्व मास्टीक अस्फाल्टच्या कामाचा अंदाजपत्रकीय खर्च रु.१४९४.९० लाख असून सार्वजनिक बांधकाम विभागाच्या विद्यमान दरसूचीनुसार सदर अंदाजित खर्च रु.१७६८.१४ लाख इतका आहे. सदर खर्च मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पासाठी प्रशासकीय मान्यता दिलेल्या निधीतून करावयाचा आहे. पूर्वी मास्टीक अस्फाल्टने केलेले काम वगळून अन्य ठिकाणी आवश्यकतेनुसार काम करण्यात येईल. त्यासाठी प्राधिकरणाचे मुख्य अभियंता रस्त्यावर खड्डे पडलेल्या ठिकाणांचा आढावा घेतील व

..२२/-

मास्टीक अस्फाल्टने करावयाची कामे निश्चित करतील. सदर ४० मि.मी. जाडीचे मास्टीक अस्फाल्टचे काम मुनष्यबळाच्या मदतीने केल्यास बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सन २००४ च्या फेअर मार्केट रेट (दरसूची) नुसार त्याचा दर रु.५१९/- प्रति चौ.मी. इतका आहे तर सार्वजनिक बांधकाम विभागाच्या विद्यमान दरसूचीनुसार सदर दर रु.६१८/- प्रति चौ.मी. इतका असून त्याचा दोषदायित्व कालावधी ५ वर्षाचा आहे. तथापि, हे काम आधुनिक तंत्रज्ञान उदा. मेकॅनिकल पेव्हर इत्यादी वापरुन केल्यास रु.७४७/- प्रति चौ.मी. इतका दर देण्यात येईल व अशा पध्दतीने केलेल्या कामाचा दोषदायित्व कालावधी १० वर्ष राहील. या कामासाठी सार्वजनिकरित्या वृत्तपत्रात जाहिरात देऊन निविदा मागविण्यात आल्या. एकूण ५ कोरे निविदा संच विकले गेले. तथापि, विहित कालावधीमध्ये ३ पूर्ण केलेल्या निविदा प्राप्त झाल्या. छाननीनंतर त्यापैकी १ देकार पात्र ठरला. मे.झूम व्ही.एस.ई.पी.एल (जॉईट व्हेंचर) यांची सदर निविदा अंदाजपत्रकीय दरापेक्षा १८.१८% जास्त दराची असल्यामुळे त्यांच्यासमवेत वाटाघाटी केल्या असता त्यांनी त्यांचा देकार अंदाजपत्रकीय दरापेक्षा १८% जास्त म्हणजे रु.१७,६३,९७,९९४/- असा सुधारित केला. हा सुधारित देकार सार्वजनिक बांधकाम विभागाच्या विद्यमान दरसूचीनुसार तयार केलेल्या अंदाजित खर्चापेक्षा ०.२३५% कमी दराचा आहे. तथापि, आधुनिक तंत्रज्ञान वापरुन केलेल्या मास्टीक अस्फाल्टच्या कामासाठी निविदाकाराचा सदर वाढीव दर लागू होणार नाही. तसेच पूर्वी काम केलेल्या कंत्राटदाराच्या दोषदायित्व कालावधीची रक्कम संबंधीत कंत्राटदाराकडून वाजवी दराने वसूल करण्यात येईल. मे.झूम व्ही.एस.ई.पी.एल (जॉईट व्हेंचर) यांचा सुधारित देकार निविदेतील सर्व अटींचे अनुपालन करणारा, सुसंवादी व रास्त असल्यामुळे कार्यकारी समितीच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आला आहे.

**१०.२** त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :—

**ठराव क्र.१०१७ :**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोट-कलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या

अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, कार्यकारी समिती याद्वारे मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत पूर्व द्रुतगती महामार्गावरील पॅकेज क्र.१३ ते १५ मधील गोदरेज गेट (उत्तर) ते मुलुंड चेकनाका या भागातील मास्टीक अस्फाल्टच्या कामासाठी मे.झूम.व्ही.एस.ई.पी.एल. (जॉईंट व्हेंचर) यांची रु.१७,६३,९७,९९४/- (रु.सतरा कोटी त्रेसष्ठ लाख सत्याण्णव हजार नऊशे चौ-याण्णव मात्र) इतक्या किंमतीची निविदा स्विकारण्यास व त्या अनुषंगाने करण्यात येणा-या करारनाम्यातील अटींप्रमाणे देय होणा-या संभाव्य आर्थिक बदलासह अधिदान करण्यास मान्यता देत आहे. आधुनिक तंत्रज्ञान वापरुन केलेल्या मास्टीक अस्फाल्टच्या कामासाठी निविदाकाराचा सदर वाढीव दर लागू होणार नाही. तसेच पूर्वी काम केलेल्या कंत्राटदाराच्या दोषदायित्व कालावधीची रक्कम संबंधीत कंत्राटदाराकडून वाजवी दराने वसूल करण्यात येईल.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.११ : मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्प (MUIP) : अंधेरी-कुर्ला जोडरस्त्यांच्या साकीनाका ते लाल बहादूर शास्त्री मार्ग हया भागात तसेच जरीमरी रस्ता व काळे मार्गाचे रुंदीकरण व बांधकामाच्या लघुत्तम निविदेला मान्यता देणेबाबत.**

**११.१** या प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, साकीनाका ते लाल बहादूर शास्त्री मार्गापर्यंत एकूण २८०० मीटर लांबीचा अंधेरी-कुर्ला जोडरस्त्याचा भाग तसेच एकूण १४०० मीटर लांबीचा जरीमरी रस्ता व ६०० मीटर लांबीचा काळे मार्ग यांची रुंदी फारच कमी असल्यामुळे वाहतूकीची कोंडी होते. त्यामुळे या रस्त्यांची सुधारणा करुन रुंदीकरण करण्यासाठी कार्यकारी समितीच्या मान्यतेने मे.के.बी.ब्रम्हपुत्रा (जे.व्ही.) यांची निविदेतील दराप्रमाणे नियुक्ती करण्यात आली होती. तथापि, अतिक्रमणे हटविण्यास झालेला विलंब, विमानपत्तन प्राधिकरण आदी भागातील मोकळी जागा संपादन करण्यास झालेला विलंब यामुळे कार्यारंभ आदेशानंतर २० महिन्याच्या कालावधीनंतर एकूण २३% काम पूर्ण करणे शक्य

झाले. म्हणून संभाव्य विलंब व परिणामी यंत्रसामुग्री आदींचा अपुरा वापर यामुळे ठेकेदाराचे नुकसानभरपाईचे दावे टाळण्यासाठी कंत्राट करारातील तरतूदीनुसार तसेच कंत्राटदाराच्या अर्जाप्रमाणे सदर करार रद्द करण्यात आला व उर्वरित काम नवीन कंत्राटाद्वारे हाती घेण्याचे ठरविण्यात आले. या उर्वरित कामांमध्ये प्रामुख्याने अतिरिक्त (१+१) काँक्रीटची मार्गीका बांधणे, रस्त्याच्याकडेला काँक्रीट गटारांचे बांधकाम, नाल्याचे सरळीकरण व पक्के बांधकाम तसेच पदपथांचे बांधकाम समाविष्ट आहे. या कामासाठी नव्याने निविदा मागविण्यासाठी मूळ किंमत रु.२३,२८,८९,३४७/- अधिक ५% सेवा वाहिनी स्थलांतर अधिक ५% आकस्मिक खर्च धरुन एकूण रु.२५,६१,७८,३००/- किंमतीच्या सुधारित अंदाजपत्रकास तांत्रिक मंजूरी देण्यात आली आहे. या कामामुळे बाधित होणाऱ्या प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाची कार्यवाही प्रगतीपथावर आहे. या कामासाठी सार्वजनिकरित्या वृत्तपत्रात जाहिरात देऊन निविदा मागविण्यात आल्या. एकूण ५ कोरे निविदा संच विकले गेले. तथापि, विहित कालावधीमध्ये ३ पूर्ण केलेल्या निविदा प्राप्त झाल्या. त्या निविदांची छाननी केली असता सर्व निविदाकार पात्र ठरले. त्यापैकी मे.प्रतिभा - रोहित (जे.व्ही.) यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा ९.९०% जास्त दराची निविदा लघुत्तम असून वाटाघाटीनंतर सदर लघुत्तम निविदाकारांनी सादर केलेला सुधारित देकार अंदाजित खर्चापेक्षा ५% जास्त दराचा म्हणजे रु.२६,८९,८७,१९५/- (तरतूद रक्कम धरुन) इतका आहे. सुधारित लघुत्तम देकार हा निविदेतील सर्व अटींचे अनुपालन करणारा, सुसंवादी व रास्त आहे. म्हणून सदर लघुत्तम देकार कार्यकारी समितीच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आला आहे. सदर कामासाठी होणारा खर्च असाईड (ASIDE) योजनेंतर्गत करावयाचा असून केंद्र शासनाकडून या खर्चापैकी ५०% रकमेची प्रतिपूर्ती अनुदान स्वरुपात प्राधिकरणास मिळणार असून उर्वरित ५०% खर्च प्राधिकरणाने मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत करावयाचा आहे.

**११.२** त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :—

**<u>ठराव क्र.१०१८</u> :**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण

अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोट-कलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, कार्यकारी समिती याद्वारे मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत अंधेरी-कुर्ला जोडरस्त्याच्या साकीनाका ते लाल बहादूर शास्त्री मार्ग हया भागात तसेच जरीमरी रस्त्याचे व काळे मार्गाचे रुंदीकरण व बांधकामाच्या कामासाठी मे.प्रतिमा - रोहित (जे.व्ही.) यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५% जास्त दराची म्हणजे रु.२६,८९,८७,१९५/- (रुपये सव्वीस कोटी एकोणनव्वद लाख सत्याऐंशी हजार एकशे पंच्याण्णव मात्र) किंमतीची (तरतूद रकमेसह) लघुत्तम निविदा स्विकारण्यास व त्या अनुषंगाने करण्यात येणा-या करारनाम्यातील अटींप्रमाणे देय होणा-या संभाव्य आर्थिक बदलासह अधिदान करण्यास मान्यता देत आहे. सदर कामासाठी होणारा खर्च केंद्र शासनाच्या असाईड (ASIDE) योजनेंतर्गत करावयाचा असून केंद्र शासनाकडून या खर्चापैकी ५०% रकमेची प्रतिपूर्ती अनुदान स्वरुपात प्राधिकरणास मिळणार आहे. उर्वरित ५०% खर्च प्राधिकरणाने मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत करावयाचा आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.१२ : मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्प (MUIP) : अंधेरी - कुर्ला जोडरस्त्याच्या साकीनाका ते लाल बहादूर शास्त्री मार्ग हया भागात तसेच जरीमरी रस्ता व काळे मार्ग हयांमध्ये जलवाहिन्या टाकण्याच्या लघुत्तम निविदेला मान्यता देणेबाबत.**

**१२.१** या प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या नियमानुसार पाणीपुरवठा करणा-या जलवाहिन्या प्रस्तावित कॉंक्रीट धावपट्टीखाली जात असल्यास कॉंक्रीट धावपट्टीचे काम करण्यापूर्वी नव्या जलवाहिन्या बाजूच्या लवचिक (flexible) प्रकारच्या धावपट्टीखाली टाकून त्या कार्यान्वीत करणे बंधनकारक आहे. साकीनाका ते लाल बहादूर शास्त्री मार्गापर्यंत एकूण २८०० मीटर लांबीचा अंधेरी-कुर्ला

जोडरस्त्याचा भाग तसेच एकूण १४०० मीटर लांबीचा जरीमरी रस्ता व ६०० मीटर लांबीचा काळे मार्ग यामध्ये कॉंक्रीट धावपट्टीचे काम करावयाचे असल्यामुळे नवीन जलवाहिन्या टाकणे आवश्यक आहे. या कामासाठी रु.८,२५,०१,०१०/- खर्चाची सविस्तर अंदाजपत्रके तयार करुन त्यास तांत्रिक मंजूरी देण्यात आली आहे. या कामासाठी सार्वजनिकरित्या वृत्तपत्रात जाहिरात देऊन निविदा मागविण्यात आल्या. एकूण १३ कोरे निविदा संच विकले गेले. तथापि, विहित कालावधीमध्ये ३ पूर्ण केलेल्या निविदा प्राप्त झाल्या. त्या निविदांची छाननी केली असता सर्व निविदाकार पात्र ठरले. त्यापैकी मे.एस.बी.खाकाळ यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३३.३०% कमी दराची म्हणजे रु.५,५०,२८,१७३.६७ किंमतीची निविदा लघुत्तम आहे. या संबंधात लघुत्तम निविदाकाराकडे विचारणा केली असता त्यांनी असे स्पष्ट केले की, या कामासाठी लागणा-या वाहिन्या जुन्या दराने उपलब्ध होणार आहेत तसेच त्यांच्याकडील प्राधिकरणाची जलवाहिन्यांची कामे पूर्णत्वाच्या टप्प्यावर असल्याने त्यासाठी वापरात असलेले मनुष्यबळ / यंत्रसामुग्री इत्यादींचा प्रभावीपणे वापर करणे शक्य होणार आहे. या सर्व बाबी विचारात घेता मे.एस.बी.खाकाळ यांचा लघुत्तम देकार निविदेतील सर्व अटींचे अनुपालन करणारा, सुसंवादी व रास्त आहे. म्हणून सदर लघुत्तम देकार कार्यकारी समितीच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आला आहे. हा खर्च मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पास मान्यता देताना सेवा वाहिन्या स्थलांतरीत करण्याकरीता लागणा-या खर्चाच्या तरतूदीमधून करण्यात येईल.

**१२.२** त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-

<u>ठराव क्र.१०१९</u> :

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोट-कलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, कार्यकारी समिती याद्वारे मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत अंधेरी-कुर्ला जोडरस्त्याच्या

..२७/-

साकीनाका ते लाल बहादूर शास्त्री मार्ग ह्या भागात तसेच जरीमरी रस्ता व काळे मार्ग ह्यामध्ये जलवाहिन्या टाकण्याच्या कामासाठी मे.एस.बी.खाकाळ यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३३.३०% कमी दराची म्हणजे रु.५,५०,२८,१७३.६७ (रुपये पाच कोटी पन्नास लाख अठ्ठावीस हजार एकशे त्र्याहत्तर व सदुसष्ट पैसे मात्र) किंमतीची लघुत्तम निविदा स्विकारण्यास व त्या अनुषंगाने करण्यात येणा-या करारनाम्यातील अटींप्रमाणे देय होणा-या संभाव्य आर्थिक बदलासह अधिदान करण्यास मान्यता देत आहे. सदर कामासाठी येणारा खर्च मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पास मान्यता देताना सेवा वाहिन्या स्थलांतरीत करण्याकरीता लागणा-या खर्चाच्या तरतूदीमधून करण्यात येईल.

"**असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.१३ : मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत लाल बहादूर शास्त्री मार्ग व स्वामी विवेकानंद मार्गावर मो-या (Cross Culverts) बांधण्याच्या कामाच्या लघुत्तम निविदांना मंजूरी मिळणेबाबत.**

**१३.१** या प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत लाल बहादूर शास्त्री मार्ग आणि स्वामी विवेकानंद मार्ग या रस्त्यांच्या रुंदीकरणाची कामे प्राधिकरणाने हाती घेतलेली आहेत. या रस्त्यांवर व लगतच्या परिसरामध्ये पावसाळयात पाण्याच्या अपू-या निच-यामुळे निर्माण होणारी पूरजन्य परिस्थिती टाळण्यासाठी तसेच शासनाने नियुक्त केलेल्या मेराणी कमिटीच्या शिफारशींप्रमाणे या दोन रस्त्यांवरील एकूण रु.३७,१९,७९,१९५/- इतक्या अंदाजित खर्चाच्या ६८ मो-यांची पुनर्बांधणी / विस्तारीकरण करणे आवश्यक आहे. या खर्चामध्ये मो-यांची बांधकामे करताना पाण्याच्या प्रवाहात अडथळा करणा-या जलवाहिन्या, मलवाहिन्या व अन्य सेवावाहिन्या पाण्याच्या प्रवाहातून अन्यत्र स्थलांतर करण्याची आवश्यकता निर्माण झाल्यास त्यासाठी होणा-या खर्चाची तरतूद

करण्यात आलेली आहे. या तरतूदीमधून सदर खर्चाची रक्कम संबंधीत यंत्रणेस अदा करण्यात येईल. मो-यांच्या बांधकामातील अडचणी, लागणारा दीर्घ कालावधी विचारात घेऊन वरील कामांसाठी एकच निविदा बोलावण्याऐवजी लाल बहादूर शास्त्री मार्गासाठी ५ आणि स्वामी विवेकानंद मार्गासाठी ६ निविदा सार्वजनिकरित्या वृत्तपत्रात जाहिरात देऊन मागविण्यात आल्या. त्यास अनुसरुन लाल बहादूर शास्त्री मार्गासाठी एकूण १८ कोरे निविदा संच विकले गेले व स्वामी विवेकानंद मार्गासाठी एकूण १५ कोरे निविदा संच विकले गेले आणि अनुक्रमे ११ व १२ सिलबंद लखोटयातील निविदा विहीत कालावधीत प्राप्त झाल्या. प्राप्त झालेले लघुत्तम देकार अंदाजपत्रकीय दरापेक्षा चढया दराचे असल्यामुळे लघुत्तम निविदाकारांशी वाटाघाटी करुन त्यांचे देकार कमी करण्यात आले. मात्र या दरम्यान बृहन्मुंबई महानगरपालिकेने मो-यांच्या कामासाठी सुधारित दरसूची निर्गमित केली व या नवीन दरसूचीप्रमाणे प्रत्येक निविदेतील कामाची अंदाजपत्रकीय किंमत ठरविण्यात आली. लघुत्तम निविदाकारांशी वाटाघाटी केल्यानंतर त्यांनी कमी केलेल्या देकारांची तुलना सुधारित अंदाजपत्रकीय दरांशी केली असता असे दिसून आले की, लाल बहादूर शास्त्री मार्गावरील कामांचे लघुत्तम देकार सुधारित अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४% ते १०% कमी दराचे आहेत तर स्वामी विवेकानंद मार्गावरील कामांचे लघुत्तम देकार सुमारे ४% ते ६% जास्त दराचे आहेत. मंजूर विकास आराखडयाप्रमाणे स्वामी विवेकानंद मार्गाची रुंदी लाल बहादूर शास्त्री मार्गाच्या रुंदीपेक्षा कमी असल्यामुळे तसेच वाणिज्यिक व्यवहारांमुळे या मार्गावरील वाहतूकीची वर्दळ जास्त आहे. त्यामुळे या मार्गावरील मो-यांच्या बांधकामाची प्रगती मंदगतीने होणार असून परिणामी खर्चातही वाढ होण्याची शक्यता आहे. तसेच सदरील मो-यांची बांधकामे पावसाळी पाण्याचा निचरा करण्यासाठी असली तरीही आजूबाजूच्या परिसरातून येणा-या सांडपाण्याचा प्रवाह पावसाळी मोसमाशिवायही मोठया प्रमाणात वाहत असल्यामुळे बांधकामादरम्यान पाणी उपसण्याचा खर्चही वाढणार आहे. या सर्व बाबी विचारात घेऊन लाल बहादूर शास्त्री मार्ग व स्वामी विवेकानंद मार्गावरील मो-यांच्या बांधकामासाठी सर्व लघुत्तम निविदाकारांचे कमी केलेले सुधारित देकार रास्त आहेत. तसेच हे लघुत्तम देकार निविदेतील सर्व अटींचे अनुपालन करणारे व सुसंवादी आहेत. म्हणून सदर लघुत्तम देकार कार्यकारी समितीच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आले आहेत.

१३.२ अध्यक्ष, कार्यकारी समिती यांनी विचारणा केली असता महानगर आयुक्त यांनी असे स्पष्ट केले की, सदरील मो-यांचे बांधकाम स्लॅब पध्दतीचे असून मो-यांची रुंदी ३ मी. ते ६ मी. तसेच खोली सुमारे ४ मी. इतकी असेल. काही ठिकाणी मो-यांची रचना दोन गाळयांची असेल. तसेच मो-यांची बांधकामे करताना रस्त्याच्या रुंदीतील काही भाग वाहतूकीसाठी बंद करुन टप्प्याटप्प्याने काम करावे लागेल.

१३.३ त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :—

<u>ठराव क्र.१०२०</u> :

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोट-कलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, कार्यकारी समिती याद्वारे लाल बहादूर शास्त्री मार्ग - भाग १,२,३,४ व ५ तसेच स्वामी विवेकानंद मार्ग - भाग १,२,३,४,५ व ६ यावर मो-या (Cross Culverts) बांधण्याकरीता खाली दर्शविलेल्या तक्त्याप्रमाणे लघुत्तम निविदा स्विकारण्यास व त्या अनुषंगाने करण्यात येणा-या करारनाम्यातील अटींप्रमाणे देय होणा-या संभाव्य आर्थिक बदलासह अधिदान करण्यास मान्यता देत आहे :-

| अ. क्र. | भाग क्र. | निविदेतील अंदाजपत्रकीय रक्कम (रुपये) | लघुत्तम निविदाकार | लघुत्तम निविदेची रक्कम (रुपये) |
|---|---|---|---|---|
| लाल बहादूर शास्त्री मार्गावरील मो-यांचे बांधकाम | | | | |
| १ | १ | ५,५७,२९,७८७/- | मे.आर.पी.एस.इन्फ्राप्रोजेक्ट्स | ६,७४,३३,०४२/- |
| २ | २ | २,७८,३६,७४८/- | मे.आर.के.मधानी | ३,४७,९५,९३५/- |
| ३ | ३ | ३,१३,०२,७१९/- | मे.ईगल कन्स्ट्रक्शन | ३,७५,८५,१७५/- |
| ४ | ४ | ३,२०,११,०७८/- | मे.रचना कन्स्ट्रक्शन | ३,८७,३३,४०४/- |
| ५ | ५ | ३,१०,१२,६०९/- | मे.रोहित इन्टरप्रायझेस | ३,७१,५३,१०६/- |
| स्वामी विवेकानंद मार्गावरील मो-यांचे बांधकाम | | | | |
| ६ | १ | २,६१,२४,५६५/- | मे.आर.के.मधानी | ३,२२,२२,०३८/- |
| ७ | २ | १,७३,४३,४७४/- | मे.आर.के.मधानी | २,१४,९०,२९९/- |
| ८ | ३ | २,३९,४२,१६०/- | मे.एस.व्ही.जीवानी | २,९९,२७,७००/- |
| ९ | ४ | १,७८,८९,७१०/- | मे.आर.के.मधानी | २,१७,३०,६३१/- |
| १० | ५ | २,६५,८०,१५६/- | मे.प्राईम इंजिनिअर्स | ३,३२,२५,१९५/- |
| ११ | ६ | ४,२३,९३,२१४/- | मे.प्राईम इंजिनिअर्स | ५,२९,९१,५१८/- |

..३०/-

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**<u>बाब क्र.१४</u> : <u>मुंबई नागरी परिवहन प्रकल्प : हरियाली गाव कांजुरमार्ग भूखंड क्र.१२० (भाग) येथे प्रतिभाग निधीतून (Non Bank Finance) २२/११ कि. व्हॅट क्षमतेचे विद्युत उपकेंद्र उभारण्यासाठी लागणा-या खर्चास मंजूरी मिळणेबाबत.</u>**

१४.१ या प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, मुंबई नागरी परिवहन प्रकल्पांतर्गत हरियाली गांव, कांजूर मार्ग येथील प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी बांधण्यात आलेल्या सदनिकांना विद्युत पुरवठा करण्यासाठी महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित यांनी या जागेवर २२/११ कि.व्हॅट क्षमतेचे विद्युत उपकेंद्र आवश्यक असल्याचे कळविले तसेच या उपकेंद्र उभारण्याच्या खर्चापोटी रु.२५८.१६ लाख इतकी अंदाजित रक्कम उपलब्ध करुन देण्याबाबत सूचना केली. प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी विद्युत पुरवठयाची तातडीने आवश्यकता असल्यामुळे सदरील रक्कम महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीस अदा करण्यात आली असून आता ही बाब कार्यकारी समितीच्या कार्योत्तर मान्यतेसाठी सादर करण्यात आली आहे. महानगर आयुक्त यांनी पुढे असेही सांगितले की, या विद्युत उपकेंद्राच्या उभारणीस सुरुवात झाली असून मार्च, २००७ पर्यंत पूर्ण होण्याची अपेक्षा आहे. दरम्यानच्या कालावधीत पूर्ण केलेल्या सदनिकांना सदरील कंपनीने तात्पुरता विद्युत पुरवठा सुरु केलेला आहे. तसेच सदरील विद्युत उपकेंद्र उभारण्याचा अंदाजित खर्च काम पूर्ण होईपर्यंत जास्तीत जास्त २५% पर्यंत वाढण्याची शक्यता आहे. हा वाढीव खर्चही महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी यांना अदा करण्यासाठी महानगर आयुक्त यांना प्राधिकृत करण्याचा प्रस्ताव कार्यकारी समितीच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आला आहे. हा सर्व खर्च मुंबई नागरी परिवहन प्रकल्पाच्या प्रतिभाग निधीतून (Non Bank Finance) करावयाचा आहे.

१४.२ त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :–

<u>ठराव क्र.१०२१</u> :

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोट-कलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, कार्यकारी समिती याद्वारे हरियाली गाव, कांजूरमार्ग येथे २२/११ कि. व्हॅट क्षमतेचे विद्युत उपकेंद्र उभारण्यासाठी महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित यांना रु.२५८.१६ लाख इतकी अंदाजित खर्चाची रक्कम अदा करण्यास कार्योत्तर मान्यता देत आहे.

"**असाही ठराव करण्यात येत आहे की,** २२/११ कि.व्हॅट क्षमतेचे विद्युत उपकेंद्र उभारणीसंदर्भात आवश्यक असलेली पुढील सर्व कार्यवाही करण्यास आणि महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित यांनी काम संपल्यानंतर कळविलेल्या अंतिम खर्चास मंजूरी देऊन मूळ रक्कमेच्या जास्तीत जास्त २५% इतका विद्युत उपकेंद्र उभारणी व जोडणीसाठी लागणारा वाढीव खर्च महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित यांना अदा करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**<u>बाब क्र.१५</u> : <u>मुंबई नागरी परिवहन प्रकल्पांतर्गत आणिक, मजास व मानखुर्द येथे करण्यात आलेल्या पुनर्वसन कार्य परिणामांचा अभ्यास करणेसाठी सल्लागाराची नेमणूक करण्याबाबत.</u>**

१५.१ या प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, मुंबई नागरी परिवहन प्रकल्पातील प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन प्राधिकरणाने हाती घेतले आहे. जागतिक बँकेच्या सूचनेनुसार, पुनर्वसन केलेल्या प्रकल्पग्रस्तांच्या जीवनमानावर पुनर्वसनामुळे झालेल्या परिणामांबाबत सखोल अभ्यास हाती घ्यावयाचा असून या अभ्यासांतर्गत पुनर्वसनामुळे

..३२/-

प्रकल्पग्रस्तांच्या राहणीमानाच्या दर्जामध्ये झालेला बदल तपासणे, त्याअंतर्गत त्यांच्या सदनिकेची अवस्था, पायाभूत सुविधांची उपलब्धता व वापर, रोजगाराची संधी, उत्पन्न व उत्पादन क्षमता, प्रकल्पग्रस्तांच्या सहकारी संस्थांची क्षमता व कार्यपध्दती, तक्रार निवारण समितीची कार्यपध्दती इत्यादींचा आढावा घेणे व आवश्यकतेप्रमाणे उपाययोजना सुचविणे इत्यादी विषय समाविष्ट आहेत. मजास, मानखुर्द आणि आणिक येथे एकूण सुमारे ६८२३ प्रकल्पग्रस्त कुटुंबांचे पुनर्वसन करण्यात आले असून या पुनर्वसनानंतर एक वर्षापेक्षा जास्त कालावधी झालेला आहे. या सर्व प्रकल्पग्रस्त कुटुंबांचा समावेश या अभ्यासात करण्यात येणार आहे. या अभ्यासाच्या टर्म्स् ऑफ रेफरन्सना जागतिक बँकेने मान्यता दिली आहे. बाब टिप्पणीत नमूद केल्याप्रमाणे, यापूर्वी सन २००१ मध्ये मुंबई नागरी परिवहन प्रकल्पांतर्गत पुनर्वसन केलेल्या सुमारे १०,००० प्रकल्पग्रस्त कुटुंबांच्या पुनर्वसनाच्या परिणामांचा आढावा घेण्याचे काम मे.टाटा इन्स्टिटयूट ऑफ सोशल सायन्सेस (टी. आय. एस. एस.) या संस्थेद्वारे सन २००२-०३ मध्ये करण्यात आले होते. तसेच टी.आय.एस.एस. ही शहरी व ग्रामीण समाज सुधारणा, सामाजिक विकास व्यवस्थापन, सामाजिक सर्वेक्षण इत्यादी क्षेत्रात काम करणारी अग्रगण्य संस्था असून या संस्थेने अनेक प्रकल्पांच्या आपत्कालीन व्यवस्थापनाचे काम समाधानकारकपणे केलेले आहे. या सर्व बाबींचा विचार करुन मजास, मानखुर्द आणि आणिक येथे पुनर्वसन करण्यात आलेल्या प्रकल्पग्रस्त कुटुंबांच्या पुनर्वसनाचा आढावा घेण्याचे काम टी.आय.एस.एस. या संस्थेस एकमेव स्त्रोत या तत्वावर देण्याचे प्रस्तावित आहे. टी.आय.एस.एस. यांनी वाटाघाटीनंतर या अभ्यासासाठी रु.२५,३०,०००/- (सर्व करांसहीत) इतक्या फी चा सुधारित प्रस्ताव सादर केला आहे. सदर प्रस्तावास जागतिक बँकेने मान्यता दिलेली असून हा खर्च सुरुवातीस प्राधिकरणाच्या निधीतून करण्यात येईल व त्याची १००% प्रतिपूर्ती जागतिक बँकेकडून कर्जरुपाने करण्यात येणार आहे. त्यानुसार, टी.आय.एस.एस. या संस्थेची एकमेव स्त्रोत या तत्वावर तसेच रु.२५,३०,०००/- (सर्व करांसहीत) इतक्या फी वर नेमणूक करण्याचा प्रस्ताव कार्यकारी समितीच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आला आहे.

१५.२ त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :–

ठराव क्र.१०२२ :

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोट-कलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, कार्यकारी समिती याद्वारे मुंबई नागरी परिवहन प्रकल्पांतर्गत आणिक, मजास व मानखुर्द येथे पुनर्वसन करण्यात आलेल्या प्रकल्पग्रस्तांवर झालेल्या पुनर्वसनाच्या परिणामांचा आढावा घेण्याच्या अभ्यासाकरीता मे.टाटा इन्स्टिटयूट ऑफ सोशल सायन्सेस (टी.आय.एस.एस.) या संस्थेची एकमेव स्त्रोत या तत्वावर तसेच रु.२५.३० लाख (रु. पंचवीस लाख तीस हजार मात्र)(सर्व करांसहीत) इतक्या फी वर नेमणूक करण्यास मान्यता देत आहे."

बाब क्र.१६ : मुंबई नागरी परिवहन प्रकल्पांतर्गत पुनर्वसन वसाहतीत प्रकल्पग्रस्तांच्या कायमस्वरुपी पुनर्वसनोत्तर कामाचे नियोजन व अंमलबजावणी करणेसाठी सल्लागाराची नेमणूक करण्याबाबत.

१६.१ या प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, जागतिक बँकेच्या सूचनेनुसार, मुंबई नागरी परिवहन प्रकल्पांतर्गत कायमस्वरुपी पुनर्वसन वसाहतीत पुनर्वसनोत्तर कामाचे नियोजन करणे व त्याची अंमलबजावणी करणे यासाठी एका स्वतंत्र सल्लागाराची नेमणूक करण्याची आवश्यकता आहे. सल्लागाराने करावयाच्या कामाच्या टर्म्स ऑफ रेफरन्सना जागतिक बँकेने मान्यता दिलेली आहे. सल्लागाराच्या नेमणूकीसाठी सार्वजनिकरित्या वृत्तपत्रात जाहिरात देऊन प्रस्ताव मागविण्यात आले असता विहित मुदतीत एकूण १३ सल्लागारांकडून प्रस्ताव प्राप्त झाले. प्राप्त प्रस्तावांची छाननी करुन ३ पात्र सल्लागारांची संक्षिप्त सूची तयार करण्यात आली. त्यानंतर या संक्षिप्त सूचीतील सल्लागारांकडून तांत्रिक व आर्थिक प्रस्ताव मागविण्यात आले असता मे.जे.पी.एस.असोसिएट्स प्रा.लि. व टाटा

कन्सल्टन्सी सर्व्हिसेस या २ सल्लागारांनी विहित मुदतीत प्रस्ताव सादर केले. या प्रस्तावांचे मूल्यमापन केले असता मे.जे.पी.एस.असोसिएट्स प्रा.लि. यांना जास्त गुण मिळाल्याने तसेच त्यांच्या आर्थिक प्रस्तावात नमूद केलेली फी रु.५३,३३,६०४/- (सेवा कर व विमा खर्चासह) सर्वात कमी असल्याने या सल्लागाराची नेमणूक करण्याचा प्रस्ताव कार्यकारी समितीच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आला आहे. जागतिक बँकेनेही या प्रस्तावास मान्यता दिलेली असून हा खर्च सुरुवातीस प्राधिकरणाच्या निधीतून करण्यात येईल व त्याची १००% प्रतिपूर्ती जागतिक बँकेकडून कर्जरुपाने करण्यात येणार आहे. या कर्जाच्या रक्कमेची परतफेड महाराष्ट्र शासन, रेल्वे, बृहन्मुंबई महानगरपालिका यांच्याकडून प्रकल्पग्रस्तांच्या संख्येनुसार करण्यात येईल.

**१६.२** त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-

**ठराव क्र.१०२३ :**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोट-कलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन,. कार्यकारी समिती याद्वारे मुंबई नागरी परिवहन प्रकल्पांतर्गत पुनर्वसन वसाहतीत प्रकल्पग्रस्तांच्या कायमस्वरुपी पुनर्वसनोत्तर कामाचे नियोजन करणे व त्याची अंमलबजावणी करणे यासाठी मे.जे.पी.एस.असोसिएटस् प्रा.लि., नवी दिल्ली या सल्लागारांची रु.५३,३३,६०४/- (रु.त्रेपन्न लाख तेहतीस हजार सहाशे चार मात्र) (सल्लागार सेवा कर १२.२४% व विमा या खर्चासह) इतक्या फी वर नेमणूक करण्यास मान्यता देत आहे."

**बाब क्र.१७ : प्राधिकरणाकडील असलेला अतिरिक्त निधीचा गुंतवणूक अहवाल दिनांक १ जुलै, २००६ ते दिनांक ३१ ऑक्टोबर, २००६.**

दिनांक १ जुलै, २००६ ते ३१ ऑक्टोबर २००६ पर्यंतच्या प्राधिकरणाकडील अतिरिक्त निधीच्या गुंतवणूक अहवालाची नोंद कार्यकारी समितीने घेतली.

..३५/-

**बाब क्र.१८ : दिनांक ३० जून, २००६ रोजी संपणाऱ्या त्रैमासिक कालावधीचे लेखे.**

महानगर आयुक्त यांनी प्राधिकरणाच्या दिनांक ३० जून, २००६ रोजी संपणाऱ्या त्रैमासिक लेख्यांबाबत संक्षिप्त माहिती दिली. त्यानंतर, प्राधिकरणाच्या त्रैमासिक लेख्यांची नोंद कार्यकारी समितीने घेतली.

**बाब क्र.१९ : मुंबई पार बंदर जोडरस्ता (Mumbai Trans Harbour Link) - विकिरण व्यवस्थेकरीता (Dispersal Arrangement) मेसर्स कन्सल्टींग इंजिनिअरींग सर्व्हिसेस (इंडिया) प्रायव्हेट लिमिटेडची सल्लागार म्हणून केलेल्या नेमणूकीसाठी कार्योत्तर मान्यता मिळणेबाबत.**

१९.१ या प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, मुंबई पार बंदर जोडरस्त्याचे बांधकाम महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने हाती घ्यावयाचे आहे. सदर रस्त्याच्या दोन्ही बाजूला सुयोग्य विकिरण व्यवस्थेचे नियोजन प्राधिकरणाने तातडीने हाती घ्यावे असे शासनाने निदेश दिलेले आहेत. त्यासाठी तांत्रिक-आर्थिक सुसाध्यता अभ्यास करणे, सविस्तर संकल्पचित्र तयार करणे, खर्चाचे अंदाजपत्रक तयार करणे, तांत्रिक विनिर्दिष्टे तयार करणे, देकाराचे दस्तऐवज तयार करणे इत्यादी कामे प्राधिकरणाने करावयाची आहेत. यापूर्वी सन १९९६ व १९९८ मध्ये मुंबई पार बंदर जोडरस्त्याचा तांत्रिक-आर्थिक सुसाध्यता अभ्यास मेसर्स कन्सल्टींग इंजिनिअरींग सर्व्हिसेस या संस्थेद्वारे करण्यात आला आहे. तसेच सध्या प्रगतीपथावर असलेल्या पूर्व मुक्तमार्ग आणि आणिक-पांजरपोळ जोडरस्त्याच्या बांधकामाकरीता संकल्पचित्र तयार करण्यासाठी व प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून सदर संस्थेची नियुक्ती करण्यात आलेली आहे. म्हणून वेळेची बचत करण्याच्या दृष्टीने तसेच सदर संस्थेचे तांत्रिक मनुष्यबळ आणि यापूर्वीच्या कामाचा अनुभव विचारात घेऊन प्राधिकरणाने सदर संस्थेस मुंबई पार बंदर जोडरस्त्याच्या विकिरण व्यवस्थेच्या अभ्यासाकरीता तांत्रिक व वित्तीय देकार देण्यास सांगितले. यापूर्वी पूर्व मुक्तमार्ग प्रकल्पाकरीता सदर संस्थेची सल्लागार म्हणून नेमणूक करण्यात

आली असल्यामुळे त्यांच्या कामाच्या व्याप्तीत सुधारणा करुन आता त्यांच्याकडे विकिरण व्यवस्थेचा अभ्यास द्यावयाचा आहे. त्यासाठी मेसर्स कन्सल्टींग इंजिनिअरींग सर्व्हिसेस यांनी सुरुवातीस रु.८१,४३,०१२/- (सर्व करांसहित) इतक्या फी चा देकार सादर केला होता. त्यानंतर या संस्थेबरोबर वाटाघाटी केल्या असता त्यांनी त्यांची फी रु.५० लाख (अधिक कर) इतकी कमी केली आहे. या व्यतिरिक्त प्रचलित जिल्हा दर सूची (DSR) नुसार भूगर्भिय-तांत्रिक अन्वेषणाचा प्रत्यक्ष खर्च व त्यावर २०% पर्यवेक्षणाचे शुल्क सल्लागारांना अदा करावे लागेल. त्यानुसार, सदर अभ्यास तातडीने हाती घेण्यासाठी अध्यक्ष, कार्यकारी समिती यांची मान्यता घेऊन दिनांक ३ ऑक्टोबर, २००६ रोजी मेसर्स कन्सल्टींग इंजिनिअरींग सर्व्हिसेस यांची सल्लागार म्हणून नियुक्ती केली आहे व आता ही बाब कार्यकारी समितीच्या कार्योत्तर मान्यतेसाठी सादर करण्यात आलेली आहे.

**१९.२** त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :—

**<u>ठराव क्र.१०२४</u> :**

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोट-कलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, कार्यकारी समिती याद्वारे मुंबई पार बंदर जोडरस्त्याच्या विकिरण व्यवस्थेकरीता तांत्रिक-आर्थिक सुसाध्यता अभ्यास करणे, सविस्तर संकल्पचित्र तयार करणे, खर्चाचे अंदाजपत्रक तयार करणे, तांत्रिक विनिर्दिष्टे तयार करणे, देकाराचे दस्तऐवज तयार करणे इत्यादीसाठी मेसर्स कन्सल्टींग इंजिनिअरींग सर्व्हिसेस (इंडिया) प्रायव्हेट लिमिटेड या संस्थेची रु.५० लाख (अधिक कर) व प्रचलित जिल्हा दर सूची (DSR) नुसार होणारा भूगर्भिय-तांत्रिक अन्वेषणाचा प्रत्यक्ष खर्च व त्यावर २०% पर्यवेक्षणाची फी, इतक्या फी वर नेमणूक करण्यास कार्योत्तर मान्यता देत आहे."

**बाब क्र.२० : विकसनशील राष्ट्रांकरीता परिवहन नियोजन व अंमलबजावणीच्या पध्दती : पायाभूत सुविधा यंत्रणा (टिपीएमडीसी - २००६) या विषयावरील ७ वी आंतरराष्ट्रीय कार्यशाळा प्रायोजित करण्याबाबत.**

२०.१ या प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, भारतीय तंत्र विज्ञान संस्था (आय आय टी), मुंबई या संस्थेने विकसनशील राष्ट्रांकरीता परिवहन नियोजन व अंमलबजावणीच्या पध्दती - पायाभूत सुविधा यंत्रणा या विषयावर एक आंतरराष्ट्रीय कार्यशाळा दिनांक १ ते ३ डिसेंबर, २००६ या कालावधीत आयोजित केली आहे. या कार्यशाळेच्या समन्वयकांनी प्राधिकरणास विनंती केली आहे की, या कार्यशाळेमध्ये सहभागी व्हावे व रु.१ लाख इतके वित्तीय सहाय्य पेट्रन स्पॉन्सरशिपद्वारे द्यावे तसेच अशाप्रकारच्या प्रायोजिकतेमुळे प्राधिकरणाच्या दोन प्रतिनिधींना सदर कार्यशाळेत सहभागी होता येईल. परिवहन क्षेत्रातील पायाभूत सुविधांचे विविध प्रकल्प प्राधिकरण राबवित असल्यामुळे या कार्यशाळेतून प्राधिकरणाला अनुभवाची देवाणघेवाण करता येईल. या दृष्टीकोनातून प्राधिकरणाने या कार्यशाळेत सहभागी व्हावे व त्यासाठी प्रायोजनाची रक्कम म्हणून रु.१ लाख आय आय टी, मुंबई यांना द्यावी असा प्रस्ताव कार्यकारी समितीच्या मान्यतेसाठी सादर केला आहे.

२०.२ महानगर आयुक्त यांनी पुढे असेही सांगितले की, आय आय टी, मुंबई या संस्थेने Cities and Floods या विषयावर दिनांक १७ ते १८ नोव्हेंबर, २००६ या कालावधीत एक परिसंवाद आयोजित केला होता. पाऊस व पूर यासंबंधात करावयाच्या विविध उपाययोजना यासंबंधात सदर परिसंवादामध्ये चर्चा होणार असल्यामुळे तसेच प्राधिकरणाने विविध पायाभूत सुविधांचे प्रकल्प तसेच मिठी, दहिसर, पोयसर आणि ओशिवरा या नद्यांचे अभ्यास हाती घेतले असल्याने त्याचप्रमाणे आय आय टी, मुंबई या संस्थेकडून प्राधिकरणास वेळोवेळी मार्गदर्शन प्राप्त

होत असल्यामुळे सदर परिसंवादाच्या प्रायोजनाची रक्कम म्हणून रु.५०,०००/- आय आय टी, मुंबई या संस्थेस देण्यात आली आहे. यासाठीही कार्यकारी समितीने कार्योत्तर मान्यता द्यावी.

२०.३ त्यानंतर, वरील दोन्ही प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :–

**ठराव क्र.१०२५ :**

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** कार्यकारी समिती याद्वारे भारतीय तंत्र विज्ञान संस्था (आय आय टी), मुंबई या संस्थेने दिनांक १ ते ३ डिसेंबर, २००६ या दरम्यान आयोजित केलेल्या विकसनशील राष्ट्रांकरीता परिवहन नियोजन व अंमलबजावणीच्या पध्दती - पायाभूत सुविधा यंत्रणा या विषयावरील ७ व्या आंतरराष्ट्रीय कार्यशाळेच्या प्रायोजनासाठी रु.१,००,०००/- (रुपये एक लाख मात्र) इतके वित्तीय सहाय्य देण्यास मान्यता देत आहे.

"**असाही ठराव करण्यात येत आहे की,** भारतीय तंत्र विज्ञान संस्था (आय आय टी), मुंबई या संस्थेने दिनांक १७ ते १८ नोव्हेंबर, २००६ या दरम्यान आयोजित केलेल्या Cities and Floods या विषयावरील परिसंवादाच्या प्रायोजनासाठी रु.५०,०००/- (रुपये पन्नास हजार मात्र) इतके वित्तीय सहाय्य देण्यास कार्योत्तर मान्यता देण्यात येत आहे."

**मा.अध्यक्षांच्या परवानगीने चर्चा केलेले इतर विषय :–**

महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, प्राधिकरणाने पायाभूत सुविधांचे विविध प्रकल्प हाती घेतले असून या प्रकल्पांचा खर्च प्राधिकरणाच्या निधीतून करण्यात येतो. भविष्यात आणखी पायाभूत सुविधांचे प्रकल्प हाती घेण्यासाठी प्राधिकरणास उत्पन्नाची अतिरिक्त साधने निर्माण करावी लागतील. नवी मुंबई भागातील मुंबई पार बंदर जोडरस्त्याच्या टोकाजवळ असलेल्या प्रादेशिक उपवन क्षेत्रातील (Regional Parks Zone) जमिनी प्राधिकरणाने संपादन करुन विकसित केल्यास त्यामधून प्राधिकरणास उत्पन्न मिळू शकेल. यासंबंधात श्री.कपूर,

सह व्यवस्थापकीय संचालक, सिडको यांनी असे नमूद केले की, पायाभूत सुविधांचा विकास करण्यासाठी या जमिनीची सिडकोला आवश्यकता आहे तसेच मे. नवी मुंबई स्पेशल इकॉनॉमिक झोन हे सुध्दा या जमिनी संपादन करु इच्छितात. यासंबंधात श्री.रामानंद तिवारी, प्रधान सचिव (१), नगर विकास विभाग यांनी अशी सूचना केली की, प्रादेशिक उपवन क्षेत्र साधारणपणे डोंगराळ भागात असल्यामुळे प्राधिकरणाने प्रथम भू-योग्यता अभ्यास (Land Suitability Study) करावा व प्रस्तावाची सुसाध्यता तपासून पहावी. अध्यक्ष, कार्यकारी समिती यांनी या सूचनेस मान्यता दिली.

त्यानंतर, मा.अध्यक्षांचे आभार मानून बैठकीचे कामकाज समाप्त करण्यात आले.

——— oooooooooooo ———